महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ❖२६ जून २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक ००५ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सुट्टीकाळात वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार असून भाजप राज्य कार्यकारिणी निमंत्रित सदस्य व शिक्षक नेते अनिल बोरनारे यांच्या मागणीवरून ठाणे जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

या निर्णयाचा फायदा ठाणे जिल्ह्यातील शेकडो प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना होणार आहे. राज्यात जूनच्या पहिल्या आठवड्यात शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण झाले. या प्रशिक्षणात हजारो शिक्षक सहभागी झाले होते. दीर्घ सुट्टीच्या काळात प्रशिक्षण अथवा इतर कामासाठी शिक्षकांना बोलावल्यास त्या दिवसांची अर्जित रजांची नोंद शिक्षकांच्या सेवा पुस्तिकेत केली जाते. तथापि अनेक ठिकाणी अशा नोंदी केल्या जात नसल्याच्या तक्रारी अनिल बोरनारे यांच्याकडे शिक्षकांनी केल्या होत्या. यावर बोरनारे यांनी शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देऊन शिक्षकांना अर्जित रजा मिळावी व तशा नोंदी करण्यात याव्यात, अशी मागणी केली होती. ही मागणी मान्य करीत शिक्षण उपसंचालकांनी व ठाणे शिक्षण अधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले.

या आदेशात "ज्या प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांनी वरिष्ठ वेतन श्रेणी/निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण (गृहपाठासह) पूर्ण केल्यामुळे त्यांना सुट्टी उपभोगण्यात प्रतिबंध झाला असेल त्यांच्या खाती अर्जित रजा जमा करण्याबाबत महाराष्ट्र खासगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६ (१८) (अ) मधील वरील नियमानुसार कार्यवाही करावी," असे आदेश दिल्याने या निर्णयाचा फायदा ठाणे जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयांतर्गत असणाऱ्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शेकडो शिक्षकांना होणार असल्याचे अनिल बोरनारे यांनी सांगितले.

## ठाण्यात जागतिक दर्जाचा एकात्मिक मेट्रो कार डेपो

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे जिल्ह्यातील मोघरपाडा येथे एकूण १७४.०१ हेक्टर क्षेत्रफळ जमीन अधिकृतपणे ताब्यात घेतली आहे. या जागेवर जागतिक दर्जाचा, एकात्मिक मेट्रो कार डेपो उभारण्यात येणार आहे. हा डेपो मेट्रो ४, ४ए, १० आणि ११ या मार्गिकांसाठी एक केंद्रीय संचालन व देखभाल केंद्र असणार आहे. येथून सीएसएमटी ते मीरा रोड दरम्यान एकूण ५५.९९ किमीच्या मेट्रोमार्गाचे संचालन येथून होईल.

मोघरपाडा येथील सर्व्हे क्रमांक ३० मधील (जुना सर्वे क्रमांक २८) ही जमीन महाराष्ट्र शासनाच्या १६ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार एमएमआरडीएला 'आहे त्या स्थितीत' हस्तांतरित करण्यात आली आहे. या जमिनीवर चार मेट्रो मार्गिक उभारण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डीएमआरसी) यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार केला होता. मोघरपाडा मेट्रो डेपो हे मेट्रो ४, ४ए, १० आणि ११ या मार्गिकांसाठी एक महत्त्वाचे नियंत्रण व देखभाल केंद्र म्हणून विकसित करण्यात येणार आहे.



या डेपोमध्ये मेट्रो सेवा बंद असलेल्या वेळेत गाड्या उभ्या करण्यात येणार आहेत. तसेच सर्व मेट्रो गाड्यांची मोठी दुरुस्ती व नियमित देखभाल होईल. तसेच उपकरणे काढणे आणि नवीन बसवणे आणि त्यानंतर सुरक्षेसाठी आवश्यक ती पूर्ण चाचणी करणे, ट्रेन व डेपो प्रणालींचे कामकाज सुरळीत करण्यासाठी ऑपरेशन कंट्रोल सेंटर (ओसीसी) आणि डेपो कंट्रोल सेंटर (डीसीसी) यांच्यामार्फत एकात्मिक नियंत्रण कार्यप्रणाली अशा विविध सेवा येथे असणार आहेत.

### शेतकरी केंद्रित पुनर्वसन मॉडेल

सिडकोच्या समतोल विकासाच्या मॉडेलशी सुसंगत अशी भरपाई पद्धत एमएमआरडीएने स्वीकारली आहे. या अंतर्गत प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड देण्यात येतात, तर पट्टेधारक शेतकऱ्यांना त्यांच्या मूळ जमीनक्षेत्राच्या २२.५ टक्के भूखंड देण्यात येतात. अतिक्रमणधारकांना त्यांच्या मूळ जमीनक्षेत्राच्या १२.५ टक्के भूखंड देण्यात येतील.

### मोघरपाडा मेट्रो डेपोमधील सुविधा

- मोठ्या देखभालीसाठी १० वर्कशॉप ट्रॅक
- दैनंदिन आणि नियमित तपासणीसाठी १० निरीक्षण ट्रॅक
- रात्री गाड्या उभ्या करण्यासाठी ६४ स्टेबलिंग ट्रॅक
- चाकांचे प्रोफाइलिंग करण्यासाठी अंडर- फ्लोअर व्हील लेथ
- गाड्यांची स्वच्छता करण्यासाठी उच्च क्षमता असलेली ऑटो वॉश यंत्रणा
- अंडरफ्रेम व छतावरील उपकरणांवरील धूळ काढण्यासाठी ब्लो-डाऊन प्लांट
- कॅटेनेरी वाहने उभी करण्यासाठी व देखभालीसाठी सीएमव्ही वर्कशॉप
- संचालनासाठी डेपो कंट्रोल सेंटर (डीसीसी) आणि प्रशिक्षण कक्ष
- आवश्यक डेपो कर्मचाऱ्यांसाठी निवासी सुविधा

### बांधकाम तातडीने सुरू होणार

एमएमआरडीएने ९०५ कोटींचे कंत्राट मे. एसईडब्ल्यू-व्हीएसई जॉइंट व्हेंचरला दिले आहे. त्यानुसार १३ जून २०२५ रोजी 'नोटीस टू प्रोसिड' (एनटीपी) जारी करण्यात आली असून, जमीन ठेकेदाराच्या ताब्यात अधिकृतपणे देण्यात आली आहे. यामुळे डेपोचे बांधकाम तत्काळ सुरू होणार आहे.



## लोकलला तातडीने स्वयंचलित दरवाजे बसवा

### मुंबई हायकोर्टाची सूचना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मध्य रेल्वे मार्गावरील लोकलमधून प्रवासी खाली पडण्याचे प्रमाण गंभीर आहे. प्रवाशांचा लोकल ट्रेनमधून पडून मृत्यू होणे चिंताजनक आहे. त्यामुळे लोकलला तातडीने स्वयंचलित दरवाजे बसवावेत, अशी सूचना मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी केली. मुंब्रा येथे काही दिवसांपूर्वी दोन गाड्यांना घासून १३ प्रवासी खाली पडले होते. त्यात ५ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर हायकोर्टाने ही तीव्र चिंता व्यक्त केली. जीवघेण्या अपघाताचे सत्र रोखण्यासाठी लोकलला लवकरात लवकर स्वयंचलित दरवाजे बसवा, अशी सूचनाही न्यायालयाने केली. ९ जून रोजी मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या लोकल ट्रेनच्या दरवाजात लटकणारे १३ प्रवासी खाली पडले. त्यातील पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आली. उपनगरीय रेल्वे मार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीच जनहित याचिका दाखल झाली आहे. त्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

यावेळी खंडपीठाने मुंब्रा येथील अपघाताच्या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त करीत रेल्वे प्रशासनाला लोकलला लवकरात लवकर स्वयंचलित दरवाजे बसवण्याची सूचना केली. तुम्ही जे काही उपाय केले आहेत ते पुरेसे नाहीत, असे दिसते. धावत्या गाड्यांमधून पडून प्रवासी मरत आहेत. दररोज सुमारे १० प्रवासी अपघातात मरतात. तुमच्या स्वतःच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होत आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे, अशी टिप्पणी न्या. मारणे यांनी सुनावणीवेळी केली. आम्हाला फक्त एवढेच वाटते की, भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये, असे मत मुख्य न्यायमूर्ती आराधे यांनी व्यक्त केले.

रेल्वेकडून बाजू मांडताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग यांनी, वेळोवेळी प्रतिबंधात्मक पावले उचलण्यात आली आहेत आणि ९ जूनच्या घटनेनंतर वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्तांच्या नेतृत्त्वाखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालाची वाट पाहत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अतिक्रमण रोखण्यासाठी 'ट्रॅक डिव्हायडर' बसवणे, फूटबोर्ड आणि प्लॅटफॉर्ममधील अंतर कमी करणे आणि प्लॅटफॉर्मवरील गर्दी कमी करण्यासाठी अन्न आणि पुस्तकांचे स्टॉल हटवणे आदी विविध उपाययोजनांकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. तथापि खंडपीठाने त्यावर असमाधान व्यक्त केले आणि लवकरात लवकर लोकल ट्रेनना स्वयंचलित दरवाजे बसवण्याची सूचना केली. त्यासाठी रेल्वेला मुदत देत खंडपीठाने सुनावणी तहकूब केली.

## जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सुयश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे सुयश दिनांक २२/०६/२५ ते दिनांक ३०/६/२०२५ दावणगिरी कर्नाटक या ठिकाणी सुरू असलेल्या राष्ट्रीय Powerlifting स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनि केली उल्लेखनिय कामगिरी कु. विराज पावसकर ५९ किलो वजनी गटात सुवर्ण पदक कु. मोरेश कार्ले ७४किलो वजनी गटात बेंच प्रेस प्रकारात कांस्य पदक त्यांच्या या कामगिरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे सर,महाविद्यालयाची प्राचार्य डॉ.वाघ सर यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




## ठाण्यात वातानुकूलित बसेस दाखल होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणेकरांचा टीएमटीचा प्रवास सुखद आणि गारेगार होणार आहे. लवकरच ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात १५ ऑगस्टच्या दिवशी २५ नवीन इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहेत. पंतप्रधान इलेक्ट्रिक बस योजनेच्या माध्यमातून १०० बस परिवहन सेवेत समाविष्ट होणार आहेत. त्यातील पहिल्या टप्प्यात २५ बस दाखल होतील. या सर्व बस वातानुकूलित असणार आहेत. तर उर्वरित बस टप्प्याटप्प्याने परिवहन सेवेत दाखल होणार आहेत.



इलेक्ट्रिक बस या पर्यावरणपूरक आहेत. विशेष म्हणजे डिझेलच्या तुलनेत यांचा खर्च कमी येतो. इलेक्ट्रिक बस पायी प्रति किमी साधारण २५ रुपयांची बचत होते आहे. एक इलेक्ट्रिक बस दिवसाला सुमारे १०० ते १२० किमी अंतर धावते. याचा विचार केल्यास एका इलेक्ट्रिक बस मागे दिवसाला साधारण अडीच हजार तर महिन्याला ७५ हजार रुपयांची बचत होते. त्यानुसार पंतप्रधान इलेक्ट्रिक बस योजनेच्या माध्यमातून १०० नवीन गाड्या ठाणे परिवहन सेवेला मिळणार आहेत. यासर्व इलेक्ट्रिक बस वातानुकूलित असणार आहेत. यात नऊ मीटरच्या ६० आणि १२ मीटरच्या ४० बसचा समावेश असणार आहे.

या बस यापूर्वी मार्च अखेरीपर्यंत ठाणे परिवहन सेवेत दाखल होणार होत्या. मात्र त्याला विलंब झाला आहे. परंतु आता येत्या १५ ऑगस्टला ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात दाखल होणार आहे.

## मुंब्रा रेल्वे अपघातातील मृतांची संख्या पाचवर


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान घडलेल्या रेल्वे दुर्घटनेत चार प्रवाशांना आपले जीव गमवावे लागले होते. तर यातील दोघा गंभीर जखमींवर ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. परंतु त्यातील अनिल मोरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळे मृतांचा आकडा पाचवर पोहोचला आहे. महापालिकेच्या कळवा रुग्णालयात दाखल असलेल्या ७ जखमींना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान सोमवारी ९ जून रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास झालेल्या रेल्वे अपघातात चार जणांचा मृत्यू झाला होता. तर आठ जखमींना महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यातील एकाला पुढील उपचारासाठी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात हलविण्यात आले होते. तर शिवा गवळी आणि अनिल मोरे या दोघा जखमींवर ठाण्यातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यातील मोरे यांची प्रकृती गंभीर होती. अखेर गेल्या १० दिवसांपासून त्यांची मृत्यूशी असलेली झुंज अखेर गुरुवारी सकाळी व्यर्थ ठरली.




मोरे हे शहापूर तालुक्यातील वासिंद येथील सिद्धार्थ नगरचे रहिवासी होते. त्यांची पत्नी अंगणवाडी सेविका असून एक मुलगा व एक मुलगी महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. मोरे हे कळवा येथील मनीषा विद्यालयात शिपाई पदावर कार्यरत होते. त्यांनी ३२ वर्षे सेवा केली होती. अपघाताच्या घटनेनंतर सुमारे १ तास त्यांना कुठलीही मदत मिळाली नाही तसेच कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातही सुमारे १ तासाहून अधिक काळ वैद्यकीय मदत मिळाली नसल्याचे कुटुंबाचे म्हणणे आहे.

आर.ओ.क्र : विमाका/कोवि/प्रशामज/२९०३

# गीतासार



**अध्याय १४**

**गुणत्रयविभागयोगः**

सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं रजसो लोभ एव च । प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ १४-१७ ॥

सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते. रजोगुणापासून निःसंशयपणे लोभ आणि तमोगुणापासून प्रमाद आणि मोह उत्पन्न होतात आणि अज्ञानही उत्पन्न होते. ॥ १४-१७ ॥

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ १४-१८ ॥

सत्त्वगुणात असलेले पुरुष स्वर्गादी उच्च लोकांना जातात. रजोगुणात असलेले पुरुष मध्यलोकात म्हणजे मनुष्यलोकातच राहातात आणि तमोगुणाचे कार्य असलेल्या निद्रा, प्रमाद आणि आळस इत्यादीत रत असलेले तामसी पुरुष अधोगतीला अर्थात कीटक, पशू इत्यादी नीच जातीत तसेच नरकात जातात. ॥ १४-१८ ॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति । गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १४-१९ ॥

ज्यावेळी द्रष्टा तिन्ही गुणांशिवाय दुसरा कोणीही कर्ता नाही, असे पाहातो आणि तिन्ही गुणांच्या अत्यंत पलीकडे असणाऱ्या सच्चिदानंदघनस्वरूप मला परमात्म्याला तत्त्वतः जाणतो, त्यावेळी तो माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. ॥ १४-१९ ॥

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत
# ड्रोन व सीसीटीव्ही दुरुस्ती प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**रायगड** : जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ड्रोन आधारित प्रणाली व सीसीटीव्ही कॅमेरा देखभाल आणि दुरुस्ती प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाला जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, विजयकुमार कुलकर्णी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जी.एस. हरळय्या, व्यवस्थापक, बँक ऑफ बडोदा चैतन्य मुड, जिल्हा समन्वयक, स्टेट बँक ऑफ इंडिया संजय गोळे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जावळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, जिल्ह्यातील कृषी व्यवसायासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर औषध फवारणी यासारख्या उपक्रमांद्वारे वाढविण्यात येणार आहे त्यासाठी शेतकऱ्यांचा मेळावा घेऊन त्यांना द्रोणच्या माध्यमातून औषध फवारणीचे फायदे समजाऊन भविष्यात त्याचा उपयोग करून आंबा पिकाचे उत्पन्न वाढ होईल यावर भर दिला जाईल.सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यात ठीक ठिकाणी सी सी टी व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.आपला जिल्हा निसर्गरम्य असल्यामुळे पर्यटनाला चालना देणारा आहे त्यामुळे लाखो पर्यटक जिल्ह्यात येत असतात.त्यांना सुंदर आणि सुरक्षित समुद्र किनारे मिळाले तर पर्यटनास आणखी चालना मिळेल यासाठी सी सी टी व्ही कॅमेरे दुरुस्ती प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. तसेच ड्रोन आणि सीसीटीव्ही क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर उद्योग संधी असून, जिल्हा प्रशासन या क्षेत्रांतील प्रशिक्षण व प्रोत्साहन यावर भर देत आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.प्रास्ताविकात बोलताना जी.एस. हरळय्या यांनी सांगितले की, रायगडसारख्या पर्यटन जिल्ह्यात ड्रोन आधारित उद्योग व्यवसायासाठी भरपूर संधी आहेत. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठीही भरपूर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या प्रशिक्षणामुळे बेरोजगार तरुणांना स्वउद्योग सुरू करण्यास मदत होईल. यावेळी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या फूड व्हॅन वाहनांचे हस्तांतरणही जिल्हाधिकारी श्री. किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने होते.

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !



आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## खवली हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना
# शालेय दप्तर व सायकलींचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : माध्यमिक शाळा खवली येथील शालेय विद्यार्थ्यांना सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीता पालरेचा यांच्या हस्ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय दप्तर वाटप करण्यात आले त्याचबरोबर आठवी ते दहावीच्या मुलींना मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले सदर कार्यक्रमास स्थानिक स्कूल कमिटी सदस्य मंगेश तळकर उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक मोरे एम. व्ही. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन श्री डुबे सरांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाच्या लेखनिक दीक्षा पवार यांनी केले. याप्रसंगी स्कूल कमिटीचे अध्यक्ष श्री यादव उपस्थित होते व खवली गावचे ग्रामस्थ हे सुद्धा उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षकांनी खूप मेहनत घेतली.

# ३५ गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे** : महाराष्ट्र गो सेवा आयोगाकडे नोंदणी करिता अर्ज केलेल्या गोशाळांना अधिकृत नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण सोहळा दि. २४ जून, २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अजिंक्य पवार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. किर्ती डोईजोडे तसेच तालुकास्तरीय पशुवैद्यकीय अधिकारी, गोशाळा व्यवस्थापक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले की, "सामाजिक सहभागातून राबविण्यात येणाऱ्या अशा पशुसंवर्धन उपक्रमांना जिल्हा परिषद ठाणे नेहमीच सहकार्य करत आली आहे. पशुधनाच्या आरोग्य संवर्धनाबरोबरच गोशाळांनी विविध उत्पादनांची निर्मिती करून स्वयंपूर्णता व उत्पन्नवाढ साधावी, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल."डॉ. प्रशांत कांबळे, प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन विभाग यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "गोशाळांनी केवळ जनावरांचे पालनच नव्हे तर स्वावलंबी व्हावं यासाठी प्रयत्न करावेत. गोमूत्र, शेण, जैविक खत, बायोगॅस, औषधी वस्तू आणि दुग्धजन्य उत्पादनांमधून उत्पादन वाढवून स्थानिक व राज्यस्तरावरील बाजारपेठा तयार करण्याकडे लक्ष द्यावे. हीच खरी ग्रामीण उद्यमशीलता आहे." अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी यावेळी उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना सांगितले की, "गोशाळांनी गोमूत्र, शेण, कंपोस्ट, बायोगॅस, औषधी साबण, आणि नैसर्गिक खत तयार करून स्थानिक बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी पुढाकार घ्यावा. यामुळे केवळ गोशाळांचा आर्थिक स्तर उंचावणार नाही तर समाजात त्यांचा सकारात्मक प्रभावही वाढेल."

हा कार्यक्रम जिल्हा परिषद ठाणेच्या पशुसंवर्धन विभागाच्या नियोजनबद्ध अंमलबजावणीचे उत्तम उदाहरण ठरले असून, जिल्ह्यातील इतर गोशाळांनीही अशाच उपक्रमांतून पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. पशुधन पर्यवेक्षक, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, ठाणे अक्षदा गायकवाड यांनी कार्यक्रमांचे प्रास्ताविक केले तर पशुधन विकास अधिकारी डॉ. दर्शन दळवी यांनी आभार व्यक्त केले.






# ज्ञानेश्वर शेजुळ यांचा वाढदिवस महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या कार्यालयात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली** : भारतीय जनता पार्टी ," हक्काची महाराष्ट्र मजदूर संघटना "संस्थापक अध्यक्ष महादूसिंग माहेर. (राणा शेठ) यांच्या डोंबिवली पश्चिम कार्यालयात या संघटनेचे सचिव श्री ज्ञानेश्वर माऊली शेजुळ यांचा वाढदिवस उत्साहात धुमधडाक्यात साजरा झाला ज्ञानेश्वर माऊली यांनी जमवलेला लोकसंग्रह आणि त्यांना दिलेल्या अतोनात प्रेम याचे ज्वलंत उदाहरण आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त आलेल्या असंख्य चहा त्यांनी दाखवून दिले. कुठल्याही क्षणी ज्ञानेश्वर यांना फोन करा निरोप घ्या ताबडतोब धावत धावत मदतीला येणार हे शंभर टक्के सत्य आहे.जमलेल्या अनेक चाहत्यांनी त्यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या आणि केक भरून आपला आनंद व्यक्त केला.या कार्यक्रमात शुभेच्छा देण्यासाठी श्री अक्षय सोनकर आणि त्यांच्या सौभाग्यवती मनीषा ताई यांच्या विवाहाचा वाढदिवस होता हे कळतात राणा शेठ यांनी विवाहाचा वाढदिवस केक कापून साजरा केला आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

या दोन्ही कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी वंदना राजपूत महिला आघाडी अध्यक्ष मनीषा सोनकर राजपूत स्वाती कदम जयश्री माने वैशाली जाधव शितल चासकर मीनाताई साळवी सर्व महिला आघाडी आणि पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.






# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई शहर-उपनगर जिल्ह्यात 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती' योजनेकरिता दि. १५ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन महामंडळाच्या मुंबई शहर-उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा व्यवस्थापक वैशाली मुडळे यांनी केले आहे.

मुंबई शहर-उपनगर जिल्हयातील मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या व उत्तीर्ण झालेल्या इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी इ. करिता महामंडळाकडून सरासरी ६०% पेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांकडून "साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती' योजनेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, मार्कशीट, दोन फोटो, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा इ. सह दोन प्रतींमध्ये आपले पुर्ण पत्यासह व भ्रमणध्वनी क्रमांकासह अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या), मुंबई- गृहनिर्माणभवन, कलानगर, तळमजला, रुम नं. ३३, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१ या पत्त्यावर दि. १५ जुलै, २०२५ पर्यंत करावेत,असे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# रेसिपी
## जिलेबी



**साहित्य:**
१ वाटी मैदा , २ चमचे कॉर्नफ्लोर १/४ चमचा बेकिंग पावडर,१/२ वाटी दही,पाणी (गरजेनुसार),केशर (थोडे धागे, पर्यायी),१ चिमूट पिवळा रंग (पर्यायी),तळण्यासाठी तेल किंवा तूप, साखरेचा पाक:१.५ वाटी साखर १ वाटी पाणी, १/४ चमचा वेलची पावडर, १ चमचा लिंबाचा रस,केशर (पर्यायी)

**कृती :** एका भांड्यात मैदा, कॉर्नफ्लोर आणि बेकिंग पावडर मिक्स करा.त्यात दही घाला आणि हळूहळू पाणी मिसळत पिठ भिजवा. पिठ जास्त पातळ किंवा जाड नसावे, स्मूथ व्हायला हवे.पिठ झाकून १२-२४ तास आंबवण्यासाठी ठेवा (उन्हाळ्यात १२ तास पुरेसे).

**साखरेचा पाक तयार करणे:** एका पॅनमध्ये साखर आणि पाणी घालून उकळी येईपर्यंत गरम करा. साखर पूर्ण विरघळल्यानंतर वेलची पावडर, केशर आणि लिंबाचा रस घाला.एकतारी पाक (जेव्हा बोटांमध्ये चिकटतो तेव्हा) तयार झाला की गॅस बंद करा.

**जिलेबी तळणे:** आंबवलेले पिठ हलक्या हाताने मिक्स करा. गरज पडल्यास थोडे पाणी घाला. पिठ एका सॉस बाटलीत किंवा पिठाच्या पिशवीत (टोकाला छोटे छिद्र) भरा.कढईत तेल किंवा तूप गरम करा (मध्यम आच).पिठ गोलाकार फिरवत जिलेबीच्या आकारात तेलात सोडा.दोन्ही बाजूंनी सोनेरी रंग येईपर्यंत तळा.

**पाकात बुडवणे:** तळलेल्या जिलेब्या गरम पाकात १-२ मिनिटे बुडवून काढा.अतिरिक पाक झटकून टिश्यू पेपरवर ठेवा.गरमागरम जिलेबी रबडी किंवा दूधासोबतही खाऊ शकता.



# आजचे राशि भविष्य

**मेष**
काही विशेष कामासाठी लांबचे प्रवास होऊ शकतात. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा मिळेल.

**वृषभ**
वादापासून दूर राहा. नौकरीच्या शोधात असलेल्या जातकांना आनंदाची बातमी मिळेल.आर्थिक परिस्थीची काळजी वाटेल. जुने मित्र भेटतील.

**मिथुन**
प्रलंबित कामे पूर्ण होतील.पैसे उधार देणे टाळा. कुटुंबाबतील नात्यात गोडवा राहील. नौकरीच्या ठिकाणी वरिष्ठांशी वाद संभवतात.

**कर्क**
कोणतेही नवीन काम करण्यासाठी दिवस कमजोर आहे.कुटुंबीयांसह कुठेतरी बाहेर जाऊ शकता. कुटुंबात एखाद्याचे लग्न ठरतील.

**सिंह**
घरातील वातावरण आनंददायी राहील. घरातील वडिलधाऱ्यांशी वाद घालू नका. आज फसवणूक होऊ शकते.कायदेशीर प्रकरणात विजय मिळेल.

**कन्या**
वाहन खरेदीचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल, परंतु अनोळखी व्यक्तीच्या प्रभावाखाली कोणतीही मोठी गुंतवणूक करू नका, अन्यथा व्यवसायासाठी हानिकारक असेल.

**तूळ**
कामात कोणताही बदल करू नका अन्यथा नंतर अडचणींना सामोरे जावे लागेल. रागाच्या वागणुकीमुळे तुमचे मन अस्वस्थ राहील.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींबाबत शिक्षकांशी बोलून दाखवावे लागणार.इकडे तिकडे धावपळ करण्यात व्यस्त असाल .

**धनु**
कोणतेही नवीन काम सुरू केले असेल तर ते मध्येच थांबवावे लागेल.मुलांकडून तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते.

**मकर**
भागीदारीत काही काम सुरू करणे तुमच्यासाठी चांगले राहील. व्यवसायातील काही अडथळे दूर करण्याचा तुम्ही पूर्ण प्रयत्न कराल.

**कुंभ**
कोणालाही न विचारता सल्ला देणे टाळावे लागेल. तुम्ही तुमचे घर, वाहन आणि घर इत्यादीसाठी खरेदी करू शकता.तुमचे कुटुंबीय तुमच्यावर नाराज राहतील.

**मीन**
मालमत्ता खरेदी करताना तुम्हाला महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल.कामासाठी तुम्हाला लांबच्या प्रवास घडेल.व्यवसायात तोटे संभवतात.




## कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते

# नव्वद टक्के अनुदानाच्या तूर बियाणाचे शेतकऱ्यांना वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जिल्हा परिषद सेस योजना कृषी निविष्ठांचा पुरवठा करणे अंतर्गत तब्बल९०टक्के अनुदानावर तूर बियाणे वाटपाचा प्रांरभ कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते व कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे यांच्या उपस्थितीत तालुक्यातील शेतकऱ्यांना करण्यात आला.

कल्याण पंचायत समितीचा कृषी विभाग सतत शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात नेहमीच आघाडीवर असतो, नुकतेच५०टक्के अनुदानावर भात बियाणाचे वाटप करण्यात आले होते, आता तब्बल९०टक्के तूर बियाणे सुमारे१००किलो कृषी विभागाला मिळाले आहे, जिल्हा परिषदेच्या सेस अंतर्गत कृषी निविष्ठांचा पुरवठा करणे मधून हे बियाणे उपलब्ध झाले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून देखील तूर अंत्यत महत्त्वाचे पीक आहे. यामुळे याचा प्रांरभ आज कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते तालुक्यातील दहागाव पोई येथील राष्ट्रीय पातळीवर शेती पुरस्कार मिळवलेले गुरुनाथ सांबरे या प्रगतीशील शेतकऱ्यांला हे बियाणे देऊन करण्यात आला, यांच्या बरोबरच, कमलाकर राऊत, सरपंच दहिवली अडीवली, दिलीप म्हाडसे, केलणी कोलम, पंढरिनाथ भोईर, आदी शेतकऱ्यांना देखील बियाणे वाटप केले. यासाठी केवळ ७/१२ उतारा लागणार आहे.यावेळी कल्याण पंचायत समितीचे कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे,कनिष्ठ सहाय्यक आर बी दळवी, पत्रकार संजय कांबळे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## ‘कामगार कार्ड’ हक्काची

# महाराष्ट्र मजूर संघटनेच्या कार्यक्रम संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : भारतीय जनता पार्टी " हक्काची महाराष्ट्र मजदूर संघटना "कामगार कार्ड या शासकीय योजनेचा कार्यक्रम कल्याण पूर्व येथील खडे गोळवली गाव, माजीउपमहापौर विक्रम रमेश तारे आणि माजी नगरसेविका कुमारी प्रियंका रमेश तरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थापक अध्यक्ष महादू सिंग माहेर (राणा शेठ) संस्थेचे सचिव ज्ञानेश्वर शेजुळ वंदना राजपूत महिला आघाडी अध्यक्ष, मनीषा सोनकर



असे अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते . नाका कामगार यांच्यासाठी शासनाच्या योजनांचा लाभ सामान्य नागरिकांना पर्यंत पोहोचवण्याकरिता हक्काची महाराष्ट्र मजदूर संघटना नेहमीच कार्यरत असते.महिलांना भांड्यासाठी तीस हजार रुपये, विवाहासाठी 20000, प्रस्तुतीसाठी 51 हजार, मुलीचा विवाह साठी, पाच लाख मृत्यू, झाल्यास दोन लाख, नैसर्गिक मृत्यू झाल्यास दोन लाख, घरकुल योजना साठी 24 लाख, विधवा विधुर प्रतिवर्षी 5 000, पहिलीचे दहावीपर्यंत विद्यार्थ्यांसाठी दहा हजार, अकरा ते बारावी पर्यंत विद्यार्थ्यांसाठी एक लाख डॉक्टरसाठी ,अनेक फायदे महाराष्ट्र राज्य शासनाकडून योजनेद्वारे दिले जातात या सर्व योजना सामान्य कामगारापर्यंत पोहोचवण्याचे काम हक्काची महाराष्ट्र मजदूर संघटना द्वारे केली जातात.

# भिवंडी-मुंबई व मुरबाड रेल्वे सेवा सुरु करण्यासाठी विशेष प्रयत्नशील

## एक वर्षात लोकसभा क्षेत्रातील नागरिकांना न्याय देण्यासाठी विशेष प्रयत्न

## - खा.सुरेश म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर व ग्रामीण भागातील सर्वसामान्य रूग्णांना स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रूग्णालयातून चांगले उपचार मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न सुरू आहेत, त्यासाठी शासनाने तातडीने या रूग्णालयास जिल्हा रुग्णालयाचा दर्जा द्यावा अशी मागणी शासनाकडे केली असल्याची माहिती भिवंडी चे खासदार सुरेश बाळा मामा म्हात्रे यांनी केली असल्याची माहिती आयोजित पत्रकार परिषद दिली. त्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांची भेट घेऊन त्यांनी निवेदन दिले असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच काही तांत्रिक त्रुटींमुळे भिवंडी मुंबई ही लोकल रेल्वे सेवा सुरू होत नाही त्यामुळे येत्या काळात ती दुर करून लवकरच लोकल सेवा सुरू केली जाईल तसेच मुरबाड रेल्वे सेवा लवकरात मार्गी लावण्यासाठी विशेष



प्रयत्न सुरू असल्याची माहिती खा.सुरेश म्हात्रे यांनी दिली.

भिवंडी खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांनी लोकसभेत शपथ घेतली त्यास एक वर्ष पुर्ण झाले त्यामुळे आपण केलेल्या कामाची माहिती देण्यासाठी खा.म्हात्रे यांनी भिवंडीत पत्रकार परिषदेत आयोजित केली होती. यावेळी त्यांनी सांगितले कि भिवंडी लोकसभा क्षेत्रात सत्ताधारी खासदारांना

**भिवंडीकरांसाठी दळणवळणाची जलद सोय उपलब्ध व्हावी यासाठी वसई दिवा रेल्वे मार्गावर भिवंडी ते दिवा दरम्यान रेल्वे सेवा वाढवावी तसेच लांब पल्ल्यांच्या या मार्गावरील गाड्यांना भिवंडी रोड रेल्वे स्थानकात थांबा द्यावा अशी मागणी रेल्वे मंत्र्यांकडे केली आहे. मुरबाड रेल्वे मार्गाचा तत्कालीन खासदारांनी पाठपुरावा केला नव्हता तो आपण केल्यानंतर हे काम प्रगतीपथा वर पुढे सरकले असल्याची माहिती त्यांनी दिली. शहापूरचा पाणी प्रश्न गंभीर आहे.भावली प्रकल्पाला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढीव निधीसह मंजुरी दिली.पण जलशुद्धीकरण प्रकल काही बनवला नाही. ठेकेदारांना पाईप लाइन टाकण्यात व श्रेय घेणाऱ्यांना ठेकेदाराची बिले मंजूर करून टक्केवारी घेण्यात स्वारस्य आहे.महसूल मंत्र्यांकडे जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव पडून होता.त्याचा पाठपुरावा केल्याने जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचा मार्ग सुकर झाला असल्याचे त्यांनी सांगितले.भिवंडीतील वऱ्हाळ तलाव सुशोभीकरण कामासाठी केंद्राने ५३ कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला पण ४० टक्के हिस्सा राज्य शासनाकडून मिळाव यासाठी राज्य सरकारकडे प्रयत्न सुरू असल्याची माहिती खा.म्हात्रे यांनी दिली.**

जे दहा वर्षात जमले नाही,त्या कामांना मी एक वर्षाच्या काळात प्रामाणिकपणे न्याय देत ती पुर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यास शासनाने सुद्धा चांगले सहकार्य केले आहे.लोकसभा निवडणुकीत भिवंडीकरांना टोरंट पावर कंपनी कडून न्याय मिळवून देईन असे आश्वासन दिले होते त्यामुळे लोकसभा सभागृहात आवाज

टोरंट पावर कंपनीचे गलथान कारभारा विरोधात प्रश्न उपस्थित करून वीज ग्राहकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.येत्या २०२७ नंतर टोरंट बाबतीत शासन योग्य निर्णय घेईल,शहरातील स्व इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयास जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून राज्य आरोग्य विभागाकडून या बाबत सर्वेक्षण सुरू केले आहे अशी खा.सुरेश म्हात्रे यांनी दिली.

# ‘दिंडी सजगतेची – आपत्ती व्यवस्थापनाची’

## संकल्पनेचा चित्ररथ, वारीत ठरतोय लक्षवेधी

मुंबई, दि. २४ :- पंढरपूरची आषाढी वारी ही महाराष्ट्राची धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेची परंपरा आहे. या वारीत ‘दिंडी सजगतेची – आपत्ती व्यवस्थापनाची’. हा राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने एक अभिनव आणि स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाच्या माध्यमातून वारीमध्ये सहभागी लाखो वारकऱ्यांमध्ये आपत्ती विषयक सजगता निर्माण करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

### चित्ररथ आणि जनजागृतीची प्रभावी माध्यम

वारीमध्ये आकर्षक पद्धतीने सजवलेले चित्ररथ, पथनाट्य पथक, माहितीपूर्ण स्टॉल्स, मोबाईल व्हॅन आणि सुलभ भाषेतील माहितीपत्रके वापरून पूर, चक्रीवादळ, दुष्काळ, गर्दी नियंत्रण यासारख्या आपत्तींविषयी माहिती दिली जात आहे. “संकटाला घाबरू नका, सज्ज राहा” असा सकारात्मक संदेश देत ही दिंडी वारकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. दि. १९ जून पासून वारीबरोबर प्रारंभ झालेल्या या संकल्पनेसाठी ४ चित्ररथ असून ६० लोकांची टीम यामध्ये सहभागी झाली आहे. दि. ६ जुलै, आषाढी एकादशीपर्यंत या चित्ररथाद्वारे व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यात येणार आहे.

चित्ररथावर विठ्ठल-रखुमाईची छायाचित्रे, वारकरी परंपरेचे दर्शन, तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध उपाययोजनांचे चित्ररूप दर्शन घडते. यामुळे ही संकल्पना अध्यात्मिक श्रद्धेच्या सोबतीने सुरक्षिततेची जाणीव देखील देत आहे.

### वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

वारीत संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांच्या दोन प्रमुख पालख्यांच्या मागोमाग गावागावातील लहान-मोठ्या दिंड्या सहभागी होत असतात. ही संपूर्ण वारी जिथे भक्तिभाव, कीर्तन, रिंगण, अभंग गजरात रंगलेली असते, तिथेच ही “दिंडी सजगतेची आपत्ती व्यवस्थापनाची” माहिती घेऊन आपले कार्य करत आहे. वारकऱ्यांनी या चित्ररथांचे आणि माहिती स्टॉल्सचे स्वागत केले असून, “सजग व सुरक्षित वारी” ही संकल्पना सर्वांच्या मनात घर करत आहे. शासनाचा हा स्तुत्य उपक्रम उपक्रम म्हणजे आपत्ती व्यवस्थापन आणि जनतेच्या सहभागाचा उत्कृष्ट संगम आहे. लाखो वारकऱ्यांचे या निमित्ताने आपत्ती व्यवस्थापन बाबत प्रबोधन होत आहे.

### सामाजिक बांधिलकीचा आदर्श

:- या उपक्रमातून केवळ आपत्ती व्यवस्थापनाची माहितीच नव्हे तर – संकट काळात कसे वागावे, आपला आणि इतरांचा जीव कसा वाचवावा, कोणती खबरदारी घ्यावी” यासंबंधी देखील प्रबोधन करण्यात येत आहे, असे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले आहे.

## आमदार शांताराम मोरे यांची

# विविध अधिकाऱ्यांसोबत विशेष आढावा बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील विविध प्रमुख रस्त्यांची खड्डयामुळे झालेली दुर्दशा पाहता व इतर विकासकामां संदर्भात भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांनी विविध अधिकाऱ्यांसोबत घेतली विशेष आढावा बैठक भिवंडी ग्रामीण मतदार संघातील रस्ते व विविध विकास कामांबाबत विशेष आढ़ावा बैठक जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दालनामधे २५ जुन रोजी घेण्यात आली यावेळी महत्वाचे म्हणजे भिवंडी-वाडा भिवंडी, चिंचोटी - कामण, अंजूरफाटा माणकोली रस्ता, अंबाडी - वांसिद रस्ता व ग्रामीणमधील इतर सर्व



रस्ते यावर सविस्तर चर्चा करण्यात तसेच पावसाळ्यामध्ये सदर रस्त्यांवर दळण - वळणासाठी चांगली व्यवस्था करुन महत्वाच्या ठिकाणी महामार्ग पोलिसांची अद्ययावत व्यवस्था ठेऊन वाहतुक कोंडीवर नियंत्रण ठेवणे व इतर आवश्यक सोईसुविधा पुरवीणेबाबत संबधीत विभाग यंत्रणेस योग्य त्या सुचना आमदार मोरे यांच्याकडून या आढावा बैठकीत देण्यात आल्या यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील शिवसेना उपनेते रुपेश म्हात्रे, जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे,अतिरिक्त महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम. एम. आर. डी. ए.)

### भिवंडीतील प्रमुख रस्त्याबाबत अधिकाऱ्यांना सुचना

अतिरिक्त पोलिस आयुक्त ठाणे शहर, पोलिस अधीक्षक महामार्ग पोलिस परिक्षेत्र ठाणे, मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य विकास महामंडल, अधीक्षक अभियंता सा.बां. विभाग ठाणे,पोलिस आयुक्त वाहतुक नियंत्रण शाखा ठाणे,कार्यकारी अभियंता नेशनल हायवे सूरत -1 शिवसेना भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख मदनबुवा नाईक वाडा तालुका प्रमुख निलेश पाटील, युवा सेना तालुका प्रमुख अजय मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# केडीएमसीच्या कंत्राटी कामगारांना सामावून घ्या

## मनसेचा केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने घनकचरा विभागात नवीन ठेकेदार नियुक्त केला असून या नव्या ठेकेदाराने जुन्या कंत्राटी कामगारांना न घेता नव्याने भरती केली असून यामुळे ६०० कामगारांना घरी बसविल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने या कंत्राटी कामगारांसह केडीएमसी मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. आधीच्या कंत्राटी कामगारांना कामावर न घेतल्यास सबंधित ठेकेदाराला कल्याण डोंबिवलीत फिरून देण्याचा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी यावेळी दिला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना कल्याण डोंबिवली अध्यक्ष उल्हास भोईर, महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेश उज्जैनकर, कार्याध्यक्ष रोहन आक्केवार, सरचिटणीस कपिल पवार, चिटणीस भिमदास जाधव, गणेश लांडगे, युनिट अध्यक्ष



मच्छिंद्र तांदळे, कैलास पारधी, रतन चव्हाण, अविनाश पाटील आदी पदाधिकाऱ्यांसह कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महानगरपालिकेच्या घनकचरा विभागात सुमारे ३५२ वाहनचालक व ११२० सफाई कामगार सेक्युर वन सिक्युरिटी सर्विसेस मध्ये काम करत होते. त्यानंतर महापालिकेतर्फे सुमित एल्कोप्लास्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ठेका देण्यात आला. महापालिकेच्या धोरणाप्रमाणे कंत्राटदार बदलला तरी कामगार तेच राहतील, याला अनुसरून नवीन कंत्राटदार सुमित एल्कोप्लास्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदाराने या कामगारांपैकी आत्तापर्यंत सुमारे ६०० कामगारांची चाचणी घेऊन त्यापैकी फक्त ३०० कामगारांना सेवेत रुजू करून घेतले व उर्वरित कामगारांना कामावर घेणे अपेक्षित असताना बाह्य यंत्रणेद्वारे कामगारांची भरती चालू केली असून एकप्रकारे कंत्राटदार कामगारांवर अन्याय करत आहे.

सनदशीर मार्गाचा अवलंब म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेने तर्फे औद्योगिक न्यायालय दावा क्रमांक ५७/२०२५ दावा केला होता. त्यात या नमूद कामगारांच्या यादी पैकी कामगारांना कामावर घेण्याचे आदेश न्यायालयाने सुमित एल्कोप्लास्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना दिलेले असूनही हा कंत्राटदार औद्योगिक न्यायालयातील यादीतील नावे वगळून बाहेरील कामगारांची भरती करत आहे. याकडे केडीएमसी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मनसेच्या वतीने केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढत धडक दिली. आधीच्या कंत्राटी कामगारांना कामावर न घेतल्यास संबंधित ठेकेदाराला कल्याण डोंबिवलीत फिरू न देण्याचा इशारा यावेळी मनसेच्या वतीने देण्यात आला.









# कल्याणमध्ये काँग्रेसच्या वतीने महामृत्युंजय जप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : राज्यात सुरू असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसतर्फे कल्याणमध्ये महामृत्युंजय जप करण्यात आला. २०२५ मध्ये कुंभ मेळा, विमान आणि मुंब्रा रेल्वे अपघातांमुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचा महामृत्युंजय जप व हवनाचा अनोखा उपक्रम घेण्यात आला. नागरिकांच्या सुख, शांती आणि दीर्घायुष्यासाठी सकारात्मक ऊर्जे साठी कल्याण डोंबिवली काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी हा धार्मिक उपक्रम राबवला. 2025 हे वर्ष सुरू झाल्यापासून राज्यात व देशात अनेक दुर्दैवी घटना घडल्या आणि घडत आहेत यात अनेक निरपराध,निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे. ही स्थिती पाहता, येणाऱ्या काळात सर्व नागरिकांना स्थैर्य, सुख, शांती आणि दीर्घायुष्य लाभावे यासाठी तसेच सकारात्मक ऊर्जेसाठी आणि सार्वत्रिक कल्याणासाठी कल्याण पूर्वेतील विठ्ठल मंदिरात महामृत्युंजय जप व हवन करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी दिली.



# पेण येथे मोफत मोतीबिंदू व नेत्र तपासणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : शांतिलाल संघवी आय इन्स्टिट्यूट मुंबई, बाफना फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुदर्शन मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि संपूर्ण नेत्र रोग निदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या नेत्र तपासणी शिबिरामध्ये एकूण १७० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६३ रुग्ण मोतीबिंदूचे आढळून आले. ३६ रूग्णांना मोतीबिंदू ऑपरेशन साठी शांतिलाल संघवी आय इन्स्टिट्यूट वडाळा,मुंबई येथे नेण्यात आले.

जैन समाज हॉल पेण येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात कॉम्प्युटराइज्ड दृष्टी चाचणी, कॉम्प्युटराइज्ड नेत्र दबाव चाचणी, शुगर आणि बी पी चाचणी, मोतीबिंदूची चाचणी, डायबेटीस रेटीनोपॅथी चाचणी, चष्म्याच्या नंबरची चाचणी करण्यात आली.या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी वडाळा येथे नेण्यासाठी वाहन सुविधा, राहणे, जेवण हे सर्व निःशुल्क असून पेण तालुक्यात यापुढे हे शिबीर ठिकठिकाणी घेण्यात येतील. त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशांत नाईक, निकिता पाटील, अमेय म्हात्रे, कोमल आव्हाड यांच्यासह शांतिलाल संघवी आय इन्स्टिट्यूटच्या कर्मचारी यांनी रुग्णांची तपासणी करण्यासाठी मेहनत घेतली.

हे शिबीर यशस्वी होण्यासाठी लीना बाफना, नितीन पाटील, कृषभ जैन, कृतिक जैन, दीपक शाह, महेंद्रशेठ बाफना, रणजित बाफना, पत्रकार विजय मोकल यांनी नियोजन केले होते.

# कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासाठी पुढील २४ तासासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. कोकण किनारपट्टीला दिनांक२५ जून २०२५ रोजीचे रात्री ८-३० वाजेपर्यंत भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आय.एन.सी.ओ.आय.एस.) तर्फे.४ ते ४.२ मीटर पर्यंतच्या उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे. राज्यात मागील २४ तासांमध्ये (२४ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) पालघर जिल्ह्यात ८२.२ मिमी पाऊस झाला आहे. तर रायगड जिल्ह्यात ८२.२, मुंबई शहर जिल्ह्यात ६१.२ मिमी, ठाणे जिल्ह्यात ५९.३ आणि रत्नागिरी जिल्ह्यात ५०.६ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज २४ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे ५९.३, रायगड ८२.२, रत्नागिरी ५०.६, सिंधुदुर्ग ३९.५, पालघर ८२.२, नाशिक ९.६, धुळे ४.८, नंदुरबार ७.५, जळगाव ३.९, अहिल्यानगर ०.९, पुणे १९.८, सोलापूर ०.३, सातारा १६.१, सांगली ६.८, कोल्हापूर ३५.१, छत्रपती संभाजीनगर २.१, जालना ०.९, बीड ०.३, लातूर ०.१, धाराशिव ०.३, नांदेड २.२, परभणी ०.६, हिंगोली २.४, बुलढाणा ५.३, अकोला ३.९, वाशिम ६.९ अमरावती २.९, यवतमाळ १०.१, वर्धा ५.१, नागपूर ३.२, भंडारा ८, गोंदिया ५, चंद्रपूर १७.८ आणि गडचिरोली जिल्ह्यात ३०.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुंबईशहर जिल्ह्यात घरचा भाग पडून एक व्यक्ती जखमी तर मुंबई उपनगर जिल्ह्यात घर पडून व झाडाची फांदी पडून या घटनेत पाच व्यक्ती जखमी झाल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी आणि रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदी इशारा पातळीवर असून याबाबत नागरीकांना दक्षतेचा सूचना देण्यात आल्या आहेत. पालघर जिल्ह्यातील सूर्या नदीत पाणी वाढल्याने एक कन्स्ट्रक्शन बोट वाहून मासवण पुलाजवळ अडकली होती. ही बोट NDRF च्या पथकाच्या मदतीने किनाऱ्यालगत करण्यात आली आहे. तसेच पालघर जिल्ह्यात अतीवृष्टिमुळे देहर्जे शीळ रस्ता आणि कुरंझे कंचाड रस्ता पुल पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील पसारवाडी (माळीण), ता. आंबेगाव येथे जमिनीत भेगा पडून दरड कोसळली. जीवीतहानी झाली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माती हटवण्याचे काम सुरू असून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

# संविधान हे जिवंत दस्तऐवज म्हणून सर्वांनीच संविधानाचे जतन करणे आवश्यक

## - केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : संविधान हे जिवंत दस्तऐवज म्हणून सर्वांनीच संविधानाचे जतन करणे आवश्यक असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. शासनाच्या निर्देशानुसार आणीबाणीच्या 50 व्या वर्धापन दिनानिमित्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अत्रे रंगमंदिरातील संपन्न झालेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

संविधानाने आपल्याला बऱ्याच प्रकारचे स्वातंत्र्य दिले आहे, हे स्वातंत्र्य असले तरी काही बंधने आणि सीमा आपण नागरिक म्हणून पाळल्या पाहिजेत, आणीबाणीच्या कालावधीत घडलेल्या घटनांवर चर्चा होवून, संविधानात काही बदल केले गेले. त्यामुळे संविधान अजून मजबुत झाले. त्यामुळे आजच्या ह्या आणीबाणीच्या वर्धापन दिनी, आणीबाणीच्या काळात ज्यांनी लढा दिला, त्यांचे स्मरण करणे हे गरजेचे आहे, असेही ते पुढे म्हणाले.

या कार्यक्रमात महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, उपआयुक्त तथा या कार्यक्रमाचे नोडल अधिकारी संजय जाधव, उपआयुक्त रमेश मिसाळ, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, जगदीश कोरे, रोहिणी लोकरे, शैलेश कुलकर्णी, शैलेश मळेकर, अशोक घोडे व्यासपिठावर उपस्थित होते. व्यासपिठावर उपस्थितांचे संविधानाची उद्देशिका देवून स्वागत करण्यात आले.

यावेळी आचार्य अत्रे रंगमंदिराच्या तळ मजल्यावर प्रदर्शित करण्यात आलेल्या आणीबाणी विषयक चित्रांच्या प्रदर्शनाचे

**आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनी आयोजिलेल्या संविधान रॅलीत हजारो विद्यार्थ्यांचा उस्फुर्त सहभाग**

आणि डिजीटल स्टॅन्डीवरील माहितीपर छायाचित्रांचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. आणीबाणीचा वर्धापन दिन म्हणजे संविधानाबाबतची आस्था, लोकशाहीचा जागर आणि राष्ट्राबाबतचे प्रखर प्रेम दर्शविण्याचा दिवस होय, असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी यावेळी आपल्या भाषणात काढले.

यावेळी काढण्यात आलेल्या संविधान जनजागृती रॅलीमध्ये महापालिकेचे इतर अधिकारी कर्मचारी आणि महापालिका क्षेत्रातील शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत उत्स्फूर्त सहभाग घेतला. आणीबाणीच्या 50व्या वर्धापन दिनी महापालिका परिक्षेत्रातील शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी केलेल्या मनमोहक, चित्तवेधक देशभक्तीपर नृत्याच्या सादरीकरणाने आणि देशभक्तीपर सुरेल गीत गायनाने तसेच महापालिकेतील दिव्यांग कर्मचारी संदेश मोरे यांनी गायलेल्या देशभक्तीपर गीताने अत्रे रंगमंदिराचे सभागृह देशप्रेमाने भारुन गेले होते.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट,
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



ईश्वरासंबंधी आपली समज व मन प्रगल्भ बनविले पाहिजे. जगतजड आहे पण त्याचे मूळ परमात्म्यामध्येच आहे. त्याच्या चैतन्यानेच जग हालचाल करते. त्या चैतन्याशिवाय विश्वातील पानही घालत नाही. आपले अलिप्तपणाचे स्वरूप न सोडता अनंत विश्वाची रचना त्याचे कडून होत असते.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करणार

## - उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : चौथे महिला धोरण २०२४ जाहीर झाले असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांनी प्रभावीपणे काम करावे. या धोरणाच्या माध्यमातून राज्य शासन महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करत आहे. मुंबई शहरातील महिलांसाठी असलेल्या योजनांबाबत एकाच ठिकाणी माहिती मिळण्यासाठी एक नवीन ॲप तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

चौथे महिला धोरण -२०२४ जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुकाणु समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.यावेळी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधानसचिव नविन सोना,जिल्हाधिकारी आंचल गोयल, अपर जिल्हाधिकारी रवि रतन कटकधोंड,निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवनंदा लंगडापुरे, उपजिल्हाधिकारी महादेव किरवले,समाजकल्याण अधिकारी रविकिरण पाटील, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, मुंबई शहर शैलेश भगत, मुंबई शहरच्या महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई शहरातील लोकसंख्या लक्षात घेवून येथील नोकरदार महिलांसाठी हॉस्टेल, लहान मुलांसाठी पाळणाघर, झोपडपट्टी भागात तसेच इतर गरजू महिला असतील त्या ठिकाणी महिला बचत गट स्थापन करणे, बचतगटांना रोटेशन पध्दतीने स्टॉल उपलब्ध करून देणे, महिलांचा पर्यटन क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी पर्यटनाचे प्रकल्प विकसित करणे, महिला मच्छिमारांसाठी शासकीय योजना राबविणे यावर भर देण्यात यावा. आदिवासी महिलांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात. घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी नियोजित प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, महिलांना आरोग्य सुविधा तत्काळ देणे तसेच काळानुरूप आरोग्य सुविधा वाढविणे याबाबत काम करावे. शासन आपल्या दारी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लखपती दीदी योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण देणे यासारख्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महिला हिंसाचाराला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जात आहेत. शासनाकडून राबविण्यात येणा-या सुरक्षा तसेच इतर महत्वपूर्ण योजना एकाच ॲपवर उपलब्ध होतील यासाठी मुंबई शहरसाठी ॲप विकसित करून ते ॲप सर्व महिलापर्यंत पोहोचवा. शासनाकडून महिलांच्या मदतीसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजना तत्काळ पोहोचवाव्यात. हेल्प डेस्कची व्याप्ती वाढवा,हिरकणी कक्ष नियमित सुरू ठेवा, महिला समुपदेशन केंद्रात तत्काळ समुपदेशन केले जावे, वन स्टॉप सेंटरमध्ये महिलांना सुविधा द्याव्यात. पोलीस स्टेशनमध्ये आल्यानंतर तक्रार देताना महिलांना आधार वाटला पाहिजे. त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता तक्रार दाखल करावी अशा प्रकारचे वातावरण पोलीस स्टेशनमध्ये असावे. शासन महिलांच्या बाबतीत आलेल्या तक्रारी फास्ट ट्रॅकवर घेत आहे. राज्याला एक ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी महिलांचाही मोठा वाटा असणे गरजेचे आहे यासाठी प्रशासनाने काम करावे असेही उपमुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले. जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी जिल्ह्यात चौथे महिला धोरण २०२४ च्या अनुषंगाने सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यांनी चौथे महिला धोरण-२०२४ संदर्भात जिल्हास्तरीय सुकाणू समिती करत असलेल्या कामाचे सादरीकरण केले. महिला व बालविकास विभाग, आरोग्य विभाग, कौशल्य विकास विभाग, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी, पोलीस प्रशासन यांच्याकडून मुंबई शहर मध्ये राबविण्यात येत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रमांची यावेळी माहिती देण्यात आली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# बहुजन समाज परिवर्तन क्रांतीत शिक्षकांचे योगदान महत्वाचे - ॲड.मंगेश ससाणे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : समाजाला वैचारिक जागृत करण्याचे काम शिक्षकाशिवाय इतर कोणीही करू शकत नाही असा ठाम विश्वास ओबीसी संघर्ष योद्धे ॲड. मंगेश ससाणे यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये मंगेश ससाणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाची राज्यस्तरीय बैठक नुकतीच पार पडली. समस्त ओबीसी बहुजन वर्गाला जागृत करून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने ओबीसी संघर्ष योद्धे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरक्षणाची न्यायालयीन लढाई लढणारे, उपोषण कर्ते , अभ्यासु वकील मंगेश ससाणे यांनी ओबीसी समाजातील विध्यार्थ्यांसाठी स्थापित केलेली महाज्योती या संस्थेबाबत माहिती देऊन महाज्योती च्या विविध योजना, शासनाकडून सुरू असलेल्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना ओबीसी महामंडळ योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ओबीसी समाजातील सुशिक्षित वर्गात जाणीव जागृती झाल्याशिवाय आपल्या हक्काचे संरक्षण होणार नाही हे स्पष्ट आहे. गेल्या दोन अडीच वर्षांत राज्यातील समाजमन ढवळून निघाले असुन अनेक कठीण प्रसंगातून ओबीसी जात आहे.यासाठी आपण एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. समाजावर होणारे अन्याय अत्याचार उघडकीला आणुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावे लागतील असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्यातील रोस्टर घोटाळा हा एक गंभीर प्रश्न असून अनेक प्रकरणात असे निदर्शनास आले आहे की, सर्वसाधारण प्रवर्गातुन नोकरी मिळालेली असताना सुद्धा नंतर च्या कालावधीत संबंधितांचे जात प्रमाणपत्र मागवुन घेत त्याचा जातीचा जो प्रवर्ग आहे त्या राखीव प्रवर्गात त्याचा समावेश केला असल्याचे बहुतांश जिल्ह्यातील शिक्षक बांधवांनी निदर्शनास आणून दिले. नाशिक जिल्ह्यात पेसा कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे नाशिक येथील पदाधिकारी बांधवांनी सांगितले. ओबीसी प्रवर्गातील मॅट्रिक पुर्व शिष्यवृत्ती विनाअट सर्वांना द्यावी, टाळाटाळ व हयगय करणाऱ्यांना दोषी धरावे याबाबतही चर्चा करण्यात आली. पदोन्नतीत ओबीसी बांधवाना संख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे याबाबत चर्चा करून ठराव घेण्यात आला. या सर्व बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी दिवाळी सुट्टीत संघटनेचे राज्य स्तरीय अधिवेशन शिर्डी अथवा अलिबाग येथे घेऊन त्या अधिवेशनात मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, बहुजन कल्याण मंत्री, ग्रामविकास मंत्री याना निमंत्रित करून त्यांना या सर्व बहुजन समाजाच्या समस्या लक्षात आणून देऊ आपण मोठ्या संख्येने या अधिवेशनात सामील व्हावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी केले.सन्माननीय ओबीसी योद्धे छगनराव भुजबळ यांच्या मंत्रिमंडळातील प्रवेशाबद्दल अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला असून लवकरच सत्कार सोहळ्याचे नियोजन करण्याचे सांगितले. राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ हा राज्यातील सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करत असताना जास्तीत जास्त संख्येने आजीवन सभासद बनवून संघटनेची ताकद महाराष्ट्रात निर्माण होण्यासाठी बहुजन शिक्षक या व्यासपीठावर यावेत यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना सर्व जिल्हा पदाधिकारी यांना केली. समाजातील सर्व ओबीसी./ एन. टी./व्ही.जे. /एन. टी./ एस. बी. सी. या सर्व विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती मिळते पण याबाबत जागरूकता नसल्याने ओबीसी विध्यार्थी या योजनांपासून कोसोदूर राहतात त्यामुळे आपण जबाबदार घटक या नात्याने आपल्या जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील सर्व विद्यार्थी यांचे प्रस्ताव सादर करून त्याचा पाठपुरावा ही करावा असे आवाहन केले.

या सभेला संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, महिला प्रदेशाध्यक्ष रेखाताई सुडे, प्रसिद्धी प्रमुख सचिन गडपतवार, राज्य कोषाध्यक्ष संजय भोईर, राज्य प्रतिनिधी राजेंद्र खैरनार, धनाजी घरत हिंगोली जिल्हाध्यक्ष लहू राक्षे, लातूर जिल्हाध्यक्ष हिरालाल पाटील, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर, खाजगी विभाग प्रमुख राजन पाटील, मनपा प्रमुख श्रीराम पळसकर, कोकण विभाग प्रमुख गोरख आघाव, मराठवाडा विभाग प्रमुख संजय मळभागे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# भिवंडी-वाडा रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षांचे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी** : भिवंडी - वाडा या महामार्गावर राज्य शासनाने कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्ता खराब झाला आहे. त्यामुळे वारंवार या रस्त्यावर अपघात व वाहतूक कोंडी चा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या हा महामार्ग मृत्यूचा सापळा व भ्रष्टाचारचा महामार्ग झाला आहे. काही वर्षांत या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असला तरी या रस्त्याची अवस्था मात्र अत्यंत दयनीय झाली आहे.त्यामुळे प्रवासी विद्यार्थी, नोकरदारवर्ग व स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत या रस्त्या संदर्भात वारंवार शासन स्तरावर तक्रारी करून सुध्दा दुर्लक्ष केले जात असल्याने अखेर आज काँग्रेस पक्षाचे ठाणे जिल्ह्याचे ग्रामीण अध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो ग्रामस्थांनी भिवंडी वाडा महामार्गावरील दुगाड गांव फाटा येथे रास्तारोको आंदोलन करीत शासन कारभाराचा निषेध व्यक्त करीत निदर्शने केली.

भिवंडी - वाडा या 40 कि.मी. अंतर असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे या खराब रस्त्यामुळे गेल्या वर्षभरापासून अनेक अपघात व वाहतूक कोंडी चे प्रश्न निर्माण झाले आहेत.वाडा येथे जाण्यासाठी दिड ते दोन तास लागत आहेत.त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. राज्य शासनाने या रस्त्याच्या दुरुस्तीवर कोट्यावधी रुपये खर्च केला आहे मात्र ठेकेदाराने तकलादू पद्धतीने काम केल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झाली आहे त्यामुळे याबाबत राज्य शासनाकडे वारंवार स्थानिक ग्रामस्थ व काँग्रेस पक्षाच्या वतीने तक्रारी करण्यात आले आहे मात्र शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

शासन व प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी हे आंदोलन करत असल्याची माहिती चोरघे यांनी दिली.यावेळी काँग्रेस अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी यावेळी खराब झालेल्या रस्त्यातील खड्डयांमध्ये बेशरम जातीची झाडे लाऊन शासन व प्रशासन यांच्या विरोधात ग्रामस्थांनी व उपस्थित काँग्रेस पक्षाचे कार्यकर्तेनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.यावेळी भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे आलेल्या प्रतिनिधीने जिल्हा काँग्रेसचे निवेदन स्वीकारले. यावेळी शरद ठाकरे,निलेश भोईर,सोहेल खान,माजी उपसभापती महेश धानके,शहापूर तालुका अध्यक्ष जितेश विशे,कल्पेश पाटील, संदेश वखारे,मुदसशील पटेल, सदानंद शेळके,संजय गायकवाड यांच्यासह भिवंडी ग्रामीण मधील काँग्रेस कार्यकर्ते,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

**राज्याचे मुख्यमंत्री,जिल्ह्याचे पालकमंत्री,राज्य व केंद्र सरकार रस्त्यांचा गलथान कारभाराला जबाबदार असून वेळीच दखल न घेतल्यास यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी यावेळी दिला.**

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024